N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** माहुर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0034 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/03/2022 19:30 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Date From (दिनांक पासून):** 24/03/2022

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/03/2022

**Time From (वेळेपासून):** 14:05 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/03/2022 **Time (वेळ):** 16:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 016 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/03/2022 19:14 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** माहुर तहसील कार्यालयाचे बाहेर, प्रशासकीय ईमारतीचे परीसरात ,माहुर, 431721

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मनोहर गणपतराव भवरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1962 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | महाडा कॉलनी,बिगबाजार जवळ, नांदेड,नांदेड,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सिंदखेड,माहुर,माहुर,नांदेड,महाराष्ट्र,431721,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** शेतकरी

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9975621549

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय एकनाथ घुमटकर | | | 1. संजय श्रीमनवार यांचे घरी ,सरस्वती विद्यामंदिरा जवळ ,किनवट,किनवट, किनवट,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे रुपयांच्या चौदा चलनी नोटा | 7,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 7,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांकः-24/03/2022.मी मनोहर गणपतराव भवरे, वय 60 वर्ष, व्यवसाय शेती व मजुरी, मुळ रा. सिंदखेड, ता. माहुर, ह.मु. महाडा कॉलनी, बिगबाजार जवळ, नांदेड मो.नं. 9975621549ला.प्र.वि.नांदेडचे पथकासोबत पोलीस स्टेषनला हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहाणारा असुन, मला एक मुलगा व एक मुलगी आहे. माझी पत्नी सुषीला मनोहर भवरे हिचे नावावर वसराम तांडा ता. माहुर येथे सर्वे नं. 29 मध्ये 2 हेक्टर 1 आर षेती आहे. ड.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलबन योजने अंतर्गत या शेतीत विहीरी करीता अनुदान मिळावे म्हणुन सन 2019-2020 मध्ये गट विकास अधिकारी माहुर यांच्या मार्फत जिल्हा परिषद नांदेड येथे प्रस्ताव पाठवीला होता. त्या प्रमाणे काम करण्यास परवानगी मिळाली. जानेवारी 2021 ला विहीरीचे खोदकाम करण्यात आले. त्या प्रमाणे 1,50,000/- रूपयाचा पहिला हप्ता मंजुर होवुन अनुदान प्राप्त झाले. विहीरीचे राहिलेले बांधकाम 15 मार्च 2022रोजी पुर्ण करण्यात आलेले असुन, त्या प्रमाणे दुसरा हप्ता मिळण्या करीता व विहीरीचे बांधकाम पुर्ण झाल्याची पाहणी करून अहवाल पाठवीण्या बाबत मी माहुर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री घुमटकर यांची भेट न झाल्याने दिनांक 21/03/2022 रोजी मी माझे मोबाईल क्रमांक 9975621549 वरून विस्तार अधिकारी श्री घुमटकर यांचे मो.नं. 7448204279 वर सायंकाळी अंदाजे 5.15 वाजता कल करून कामाचे संबधाने बोललो असता त्यांनी काम करून देणेकरीता दहा हजार रूपये खर्च येईल म्हणुन सांगीतले. त्यांनी मागणी केलेली दहा हजार रूपये ही लाच असुन लाच देणे गुन्हा असल्याने लाचलुचपत प्रतिंबधक विभागाकडुन कार्यवाही व्हावी म्हणुन मी दिनांक 21/03/2022 रोजी तक्रार दिली. विस्तार अधिकारी घुमटकर यांच्याशी माझे कोणत्याही प्रकारचे आर्थीक देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत. त्यांच्याशी माझे कोणत्याही प्रकारची दुष्मणी वैर नाही. मी दिलेल्या तक्रारी वरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पो.नि.श्री कालीदास ढवळे यांनी दिनांक 22/03/2022 रोजी त्यांच्या कार्यालयात पथकातील सदस्य स.पो.उप.नि.शेटे, पो.हे.क. श्री चिंतोरे, नाईक पो.क. श्री गंगातीर्थ, चालक ना.पो.क.शेख मुजीब तसेच पंच साक्षीदार 1) श्री नितीन चावरे, 2) श्री लतीफ ईमामखान पठाण यांचा परिचय करून दिला. पोलीस नाईक गंगातिर्थ यांनी कक्षात कृत्रीम अंधार करून अॅन्थ्रासीन पावडरचे प्रात्यक्षीक दाखवीले. पो.हे.क. श्री चिंतोरे यांनी नविन मेमरी कार्ड डिजीटल व्हईस रेकर्डरमध्ये टाकुन त्यात पो.नि. ढवळे यांचे, माझे व पंचाचे परिचय दर्शक वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. पथक सदस्यांनी संगणकीय तांत्रीक, लेखन साहित्य शासकीय वाहन टाटा सुमो एम.एच.26 आर. 267 मध्ये ठेवले. मी व पथक ला.प्र.वी. कार्यालय नांदेड येथुन 07.00 वाजता निघुन वर्कशप, भोकर फाटा, वारंगा हदगांव, उमरखेड मार्गे, माहुर नजीक लांझी रोडला निर्जनस्थळी थांबले. वाटेकरी सुभाश नुकलवाड यांना स.पो.उप.नि शेटे यांनी 11.15 कल केल्यानंतर सुभाश नुकलवाड मोटरसायकल घेवुन आले. पथक प्रमुख श्री ढवळे पो.नि. यांच्या सुचने नुसार मी व पंच क्रं.1)श्री नितीन चावरे असे श्री चिंतोरे यांचे

सोबत मोटरसायकलने माहुर पंचायत समिती नजीक गेलोत. पो.ह.श्री चिंतोरे यांनी अंदाजे 11.56 वाजता डिजीटल व्हईस रेकर्डर चालु करून माझे ताब्यात दिले. तेथुन मी व पंच क्रं.1)श्री नितीन चावरे पायी पंचायत समिती कार्यालय माहुर येथे लोकसेवक घुमटकर यांची भेट घेवुन माझा परीचय देवुन, माझे विहीर बांधकाम पुर्ण झाल्याने उर्वरीत अनुदानाचे बिला संबधाने विचारणा केली. त्यांनी मला विहीरीचे बांधकाम पाहाणीस सायंकाळी चार साडेचार वाजता येतो म्हणाले. तेथुन परत पो.ह. चिंतोरे थांबलेल्या ठिकाणी अंदाजे 12:27 वाजता गेलोत. त्यांनी माझे ताब्यातील डिजीटल व्हईस रेकर्डर बंद केले. आम्ही तिघे पथक थांबलेल्या ठिकाणी लांझी रोडला जावुन पो.नि.ढवळे यांना लोकसेवक विस्तार अधिकारी घुमटकर यांच्या भेटी दरम्यान घडलेली हकिगत सांगीतली.अंदाजे 13.30 वाजता पथक लांझी रोड पासुन निघुण सारखणी फाट्या नजीक किनवट रोडवरील षासकीय आश्रम षाळेत 14.05 वाजता पोहंचले. तेथुन अंदाजे 15.38 व 17.22 वाजताचे सुमारास माझे मोबाईलला रेंज येत नसल्या कारणाने माझे शेताचा वाटेकरी सुभाश नुकूलवाड यांचे मोबाईलने मी लोकसेवक घुमटकर यांना कल केला. असता त्यांनी पलाईगुडा फाट्याजवळ येण्यास कळवीले. पो.ह.चिंतोरे यांनी अंदाजे 17.30 वाजताचे सुमारास माझेकडे डिजीटल व्हईस रेकर्डर चालु करून दिले. मी व पंच क्रं.1)नितीन चावरे असे मोटरसायकलने पलाईगुडा फाट्या जवळ थांबलोत तेथे लोकसेवक घुमटकर कारमध्ये आले. मला कारमध्ये बसण्यास सांगीतले. शेतात गेलोत. आमचे मागेच पंच क्रं.1)नितीन चावरे मोटरसायकलने शेतात आले. तेथे लोकसेवक घुमटकर यांनी विहीरीचे बांधकामाची मोजणी केली. विहीरीचे काम नियमा प्रमाणे नाही. असे मला सांगीतले. मी त्यांना अनुदान काढण्या बद्दल विनंती केल्यानंतर विहीरीचे अनुदाने बिल टाकतो. दया की विस पंचवीस हजार. जावायाने दहा दिले तेवढे द्या. म्हणुन लाचेची मागणी केली. त्यानंतर मी त्यांना पुन्हा विनंती केल्यानंतर आठ द्या. तुमच्या मनान सात द्याअसे म्हणाले. घुमटकर तडजोडी अंती सातहजार रूपये उद्या माहुरला आणुन द्या. काम करून टाकतो. म्हणुन सात हजार रूपये लाचेची मागणी करून ती स्विकारण्याची तयारी दर्षवीली.दिनांक 23/03/2022 रोजी सापळा कार्यवाही करीता माझे पो.नि.ढवळे व पंचाचे परीचय दर्षक वक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले. पण माझ्या पत्नीची प्रकृती ठिक नसल्याने कारणाने मी ला.प्र.वि.चे पथका सोबत लोकसेवक घुमटकर यांची भेट घेण्यास हजर राहु षकालो नाही. दिनांक 24/03/2022 रोजी ला.प्र.वि. कार्यालय नांदेडहुन पंच नितीन चावरे, लतीफ पठाण पो.नि.ढवळे सोबत षासकीय वाहनाने 07.00 वाजता निघुन 10.30 वाजता माहुर येथे पोहंचलोत. लोकसेवक घुमटकर यांना मोबाईलवर संपर्क केला. त्यांनी बण्ड घेवुन येण्यास कळवीले. मी बण्ड खरेदी केला. त्यानंतर ग्रामीण रूग्णालय माहुर प्रांगणात पथक थांबले. सापळा पुर्व कार्यवाहीत पथकातील पो.ह. चिंतोरे यांनी मी हजर केलेली लाचेची रक्कम पाचशे रूपयांच्या चौदा चलनी नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावले. त्या नोटांचे क्रमांक पंच क्रं.2. लतीफ पठाण यांनी स्वतःकडे नोंदवुन घेतले. लोकसेवक विस्तार अधिकारी घुमटकर यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर गळ्यातील दस्ती हातात धरावी असा पथकास ईशारा करण्याची सुचना पो.नि. ढवळे यांनी मला दिली. सुचने प्रमाणे मी व पंच क्रं.1.नितीन चावरे असे पो.ह. चिंतोरे यांचे सोबत मोटरसायकलने तहसील कार्यालयाचे गेट बाहेर थांबलोत. थोड्या वेळाने पथक प्रमुख ढवळे व ईतर सदस्य तेथे पाई आले. पो.ह. चिंतोरे यांनी 13.50 वाजता माझे ताब्यात डिजीटल व्हईस रेकर्डर चालु करून दिले. मी व पंच क्रं.1 नितीन चावरे असे लोकसेवक घुमटकर यांचे भेटीस रवाना झालोत. ला.प्र.वि. पथक पंचायत समिती कार्यालय माहुर येथे सापळा लावण्यात आला. सापळा कार्यवाही दरम्यान पंच क्रं.1 नितीन चावरे यांचे समक्ष माझी व लोकसेवक विस्तार अधिकारी घुमटकर यांची भेट झाली. लोकसेवक घुमटकर यांनी मला सोबत घेवुन पंचायत समिती कर्यालयाचे मजल्या वरून खाली उतरून तहसील बाहेर येवुन प्रषासकीय ईमारतीचे परीसरात त्यांचे कार क्रं.एम.एच.03 बि.एच 6903 जवळ नेवुन, गाडीत ठेवुन द्या आतच्या सिटवर. अरे यार रिस्क असते पैसे घ्यायची, घेतात सगळे वरच्याना सेफ मध्ये द्यावे लागतात. असे म्हणाले. त्यावर मी त्यांना टाकु कार मध्ये? म्हणुन विचारले असता राहु द्या आता, बण्ड आणला का? असे विचारत माझेकडुन लाचेची रककम सात हजार रूपये स्विकारून पन्टचे उजव्या खिषात ठेवली. तोच मी 14.05 वाजता गळ्यातील दस्ती हातात धरून ला.प्र.वि.पथकास ईषारा केला. पथक प्रमुख ढवळे, सदस्य स.पो.उप.नि.षेटे, पो.ह. चिंतोरे, पो.ना. गंगातीर्थ यांनी लोकसेवक घुमटकर यांना ताब्यात घेवुन परिचय दिला व ला.प्र.विभागाची कार्यवाही असल्याची कल्पना दिली. घुमटकर यांनी मी लाच मागीतली नाही. म्हणुन पथकाषी झटापटी करून पळण्याचा प्रयत्न केला. पो.ह. चिंतोर यांनी माझे ताब्यातील डिजीटल व्हईस रेकर्डर 14.10 वाजता बंद केले. पो.नि.श्री ढवळे यांनी त्यांना झालेली सापळा कार्यवाही समजावुन सांगीतली. पंचाचे समक्ष झडती घेतली. लोकसेवक घुमटकर यांनी त्यांच्या पन्टचे उजव्या खिषातुन लाचेची रक्कम सात हजार रूपये काढुन हजर केली. पंच क्रं. 2) लतीफ पठाण यांनी त्यांच्या कडील असलेल्या नोटांचे क्रमांक व लाचेच्या रकमेचे क्रमांक पडताळुन पाहुन खात्री केली. पथकाचे वाहनाने लोकसेवक घुमटकर यांना ताब्यात घेवुन पोलीस स्टेषन माहुर येथे एका खोलीत अंधार करून लाचेच्या रक्कमेची पाहणी अल्ट्रव्हयलेट प्रकाषात केली. रक्कमेस अँन्थ्रासीन पावडर असल्याची खात्री करून सात हजार रूपये जप्त करण्यात आली. पो.नि. ढवळे यांनी लोकसेवक घमुटकर यांना नाव,पद, राहण्याचा पत्ता विचारला असता त्यांनी आपले नाव संजय एकनाथ घुमटकर, वय 40 वर्श, विस्तार अधिकारी, (कृषी) पंचायत समिती किनवट अतिरीक्त कार्यभार पंचायत समिती माहुर मुळ रा. जानेफळ, ता.मेहकर जि. बुलढाणा, ह.मु. संजय श्रीमनवार यांचे घरी भाड्याने, सरस्वती विद्यामंदिरा जवळ किनवट, जि. नांदेड असल्याचे कळवीले. ड.बाबासाहेब आंबेडकर कृशी स्वावलंबन योजने अंतर्गत माझी पत्नी सुषीला भवरे हिचे नावे वसराम तांडा ता. माहुर येथे असलेल्या शेतात मंजुर झालेल्या विहीरीचे बांधकामाची पाहणी करून उर्वरीत अनुदानाचे बिल मंजुर करण्या करीता पंच क्रं.1) नितीन चावरे यांच्या समक्ष स्वतःच्या आर्थीक फायद्याकरीता त्यांच्या पदाचा गैरवापर करून, मला दहा हजार रूपये लाचेची मागणी करून, तडजोडीअंती 7,000/-रूपये स्विकरण्याची तयारी दर्शवुन, दिनांक 24/03/2022 रोजी अंदाजे 14.05 वाजताचे सुमारास माहुर तहसील कार्यालयाचे बाहेर प्रशासकीय ईमारतीचे परीसरात लाच रक्कम सात हजार रूपये स्विकारलेली आहे. तरी लोकसेवक संजय एकनाथ घुमटकर, विस्तार अधिकारी पंचायत समिती माहुर यांच्या विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अंतर्गत कायदेशीर कार्यवाही व्हावी म्हणुन माझी फिर्याद आहे. ही फिर्याद दिली.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): namdev lambaji ritte(I (Inspector)) / PCMH88530 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

( पो. उप. नि. )

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची)

**Name (नाव):** namdev taniba [illegible]

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PCMH88530